प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३ नेवासा, ता. नेवासा,
जि. अहमदनगर यांचे न्यायालयात.
गुन्हयाचा तपशिल

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | - | ०७/११/२०२१ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | - | १०/०१/२०२२ |
| ३. | फिर्यादीचे नाव, राहण्याचे ठिकाण | - | महाराष्ट्र शासन, मार्फत नेवासा पोलिस स्टेशन, ता. नेवासा, जि. अहमदनगर |
| ४. | आरोपीचे नाव, राहण्याचे ठिकाण | - | विजय भागवत महाजन, वय- ४२, व्यवसाय- चालक, रा. स्वामी विवेकानंद चौक रावेर, ता. रावेर,जि. जळगांव. |

५. अ. ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराधआरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशिल.

दिनांक ०७/११/२०२१ रोजी सायंकाळी ५.०० वा. चे सुमारास खडका शिवारात अहमदनगर ते औरंगाबाद जाणारे रोडवर अहमदनगर दिशेने जाणारे बाजुस रोडवे पुर्व बाजुस ता. नेवासा येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील कार क्र. एम.एच.१९ ए.एक्स. ७१७७ ही भरधाव वेगात, चालवून मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तिला दुखापत अगर क्षती पोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून फिर्यादीची मोटारसायकल क्र. एम.एच.१७ सी. एन. ५२०२ हिस जोराने धडक दिली आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम २७९ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा गुन्हा केलेला आहे.

२. वरील, तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील कार क्र. एम.एच.१९ ए.एक्स. ७१७७ मानवी जिवीत धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून फिर्यादीच्या मोटारसायकलीस धडक देवून त्याचे पाठीमागे बसलेल्या साक्षीदाराचे गंभीर दुखापत पोचवली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ३३८ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा गुन्हा केलेला आहे असा तुमच्यावर आरोप आहे.

३. वरील, तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही खटल्याच्या परिस्थितीनुरुप तुमच्या ताब्यातील कार क्र. एम.एच.१९ ए.एक्स. ७१७७ वेगाने किंवा धोकादायकपणे चालविले व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा गुन्हा केलेला आहे.

४. वरील, तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील तुमच्या ताब्यातील

कार क्र. एम.एच.१९ ए.एक्स. ७१७७ वेगाने किंवा धोकादायकपणे चालवून अपघात केला व त्यानंतर अपघाताची खबर न देता व जखमीस वैद्यकीय मदत न करता पळुन गेला व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायदा कलम १३४**(**अ**)(**ब**)** सह कलम १७७ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा गुन्हा केलेला आहे.

आणि याद्वारे मी असे निर्देश देत आहे की, उपरोक्त आरोपाबाबत या न्यायालयाकडून तुमची न्यायचौकशी करणेत येत आहे.

सही/-
दिनांक- ११/०८/२०२५. (ए. एन. सरक)
नेवासा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा

आरोपीवरील दोषारोप तयार करण्यात आले व त्याला त्यातील मजकुर त्यांच्या भाषेत समजावुन सांगणेत आला.

सही/-
दिनांक- ११/०८/२०२५ (ए. एन. सरक)
नेवासा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा